## (अनुभव कथन)
## तूच काळजी माझी हे मी उमगलो

*– विनीतसिंह पसरणीकर, ऑस्ट्रेलिया*

---

परदेशात निघालेली व्यक्ती...इंग्रजी जेमतेम बोलता यायचे...शिक्षणही बेताचेच...परदेशात जाऊन घर, नोकरी शोधण्यापासून सर्व गोष्टी करायच्या होत्या...बापूंकडे फक्त एक सामान्य माणूस म्हणून बघण्याचा दृष्टीकोन...अशा परिस्थितीत परदेशात निघण्यापूर्वी श्रीहरिगुरुग्रामला जाण्याचा योग येतो आणि सर्व भीतींवर बापू लीलया मात करतात...ती व्यक्ती स्वत:ला कळायच्या आत एक श्रद्धावान बापूभक्त बनलेली असते.

---

सन २००० पासून बापूंबद्दल पत्नीकडून व तिच्या माहेरील मंडळींकडून वारंवार ऐकले होते. परंतु मी श्रीस्वामी समर्थांची भक्ती मना-पासून करत होतो. केवळ पत्नी विनया हिच्या आग्रहाखातर २००० साली बापू जेव्हा पुण्याला आले होते, तेव्हा त्यांचे दर्शन घेतले होते. तेव्हा वाटले की हा साधा माणूस आहे, त्यापलिकडे काही नाही. परंतु तरीही बापूंचे कार्य आणि प्रवचन खूप आवडायचे. मन मात्र त्यांची भक्ती करण्यास तयार होत नव्हते.

३० ऑक्टोबर २००९ रोजी मी ऑस्ट्रेलिया येथे स्थायिक होण्यास निघालो. मी दहावी पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर आय.टी.आय मधून वेल्डिंगचा कोर्स केला होता व टाटा मोटर्समध्ये १९९६ ते २००९ नोकरी केली. २००९ साली मला ऑस्ट्रेलियाचा 'स्किल मायग्रेशन परमनंट व्हिजा' मिळाला. माझे विमान ३१ ऑक्टोबरला सकाळी होते. त्यामुळे माझ्या मित्राने आदल्या दिवशी त्याच्या घरी मुंबईत राहण्यास सांगितले व तिथून सकाळी व्यवस्थित एअरपोर्टला जाता येईल असे सांगितले. ३० तारखेला संध्याकाळी मुंबईत पोहोचल्यावर मला सिद्धीविनायकाचे दर्शन घ्यायचे आहे असे मित्राला सांगितले. परंतु आम्ही पोहोचेपर्यंत मंदिर बंद झाले होते. माझ्या गळ्यातले बायकोने दिलेले बापूंचे लॉकेट पाहून मित्राला वाटले की मी बापूभक्त आहे. त्याने मला सांगितले, ''आज गुरुवार आहे, तू बापूंचे दर्शन घे आणि नंतर उद्या सकाळी सिद्धीविनायक मंदिरातील पहिली आरती करून तुला एअरपोर्टला सोडतो''. माझ्याबरोबर माझ्या सासरची मंडळीही होती. लगेच आम्ही श्रीहरिगुरुग्रामला गेलो.

जैसे चिडीच्या पायास दोर । बांधूनी आणिता तिजला समोर ।
तैसेच तू ओढले मला खरोखर । तूच काळजी माझी हे मी उमगलो ।

तिथे गेल्यावर दर्शनासाठी खूप मोठी रांग होती. रात्रीचे अकरा वाजले होते. रांगेतून हळूहळू पुढे गेल्यावर बापूंनी माझ्याकडे पाहून, 'तू जा, मी आहो ना, काळजी करू नकोस.' असा स्पष्ट इशारा हातवारे करून दिला. मी रांगेतून पुढे गेलो, तसे मला बापू माझ्याकडे पाहून तीच कृती करताना दिसत होते. नंतर मी साष्टांग नमस्कार केला. उठून परत बापूंकडे पाहिले. मला त्याक्षणी एक वेगळ्या प्रकारचे दर्शन झाले आणि मला असे वाटू लागले की हेच माझ्यासाठी काहीतरी करू शकतात. बापूंची ती कृती परत परत चालू होती. प्रत्येक वेळी मी त्यांच्याकडे पहायचो, तेव्हा मला बापू तेच सांगताना दिसायचे.

दर्शन घेऊन मी पुन्हा लांब जाऊन साष्टांग नमस्कार घातला. उठून उभा राहिलो तर पुन्हा बापूंची तीच कृती ! त्याक्षणी मला श्रीस्वामी समर्थांचे शब्द आठवले, 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे'. दोन्ही वाक्य एकच संकेत देत होती. ह्या बापूंच्या कृतीमुळे माझ्या मनात जी भीती उरली होती, ती कमी झाली. सकाळी उठून सिद्धीविनायकाचे दर्शन घेऊन मी एअरपोर्टवर आलो. सर्व नातेवाईक मला सोडायला आले होते.

आता माझ्या मनातील भीती विषयी थोडक्यात सांगतो. नवीन देशात जायचे. विमान सिंगापूरमध्ये बदलायचे. इंग्रजी भाषा ऐकून समजत होती, पण बोलायला घाबरत होतो. ऑस्ट्रेलियात जाऊन मला नोकरी सुद्धा शोधायची होती. त्यामुळे तिथे घराबाहेर प्रत्येक गोष्टीसाठी इंग्रजी बोलायलाच लागणार होते. नवीन देश, नवीन लोक ! त्यात जी व्यक्ती मला ऑस्ट्रेलियातील एअरपोर्टला घ्यायला येणार होती, त्या व्यक्तीला मी ५ वर्षांपूर्वी पाहिले होते. त्या व्यक्तीला मी तिथे ओळखीन का, हाही प्रश्न मनात होता. पत्नी आणि मुलांना दोन महिन्यात तिकडे घेऊन जाणे सक्तीचे होते. थोडक्यात इंग्रजी बोलायची आणि कळायची भीती वाटत होती. ही भीती बापूंच्या 'त्या' कृतीने निश्चितच कमी झाली होती.

३१ ऑक्टोबरला सिडनीमध्ये पोहोचल्यावर विमानातून उतरताना पहिले बापूंचे आणि सिद्धीविनायकाचे नाव घेतले. त्या दिवसापासून बापूंच्या छत्रछायेखाली आलो. सिडनीमध्ये आल्यानंतर सामान्य माणूस आणि सद्‌गुरु मार्गातील माणसामध्ये कसा फरक असतो हे प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीमधून मला कळत होते. मला लगेच नोकरी लागली. माझी पत्नी व मुले इथे आली व ते ही खूप लवकर सेट झाले. तिकडे जी मंडळी मला नवीन असताना भेटायला यायची, ती मला म्हणायची 'अरे तुला लगेच नोकरी कशी मिळेल? कारण नोव्हेंबर व डिसेंबर २०१५ मध्ये नाताळाच्या सुट्ट्या असतात. अशा परिस्थितीत नवीन नोकरी मिळणे थोडे कठीण असते.'

प्रत्येक गोष्टीतून बापू जाणवायचे, आठवायचे. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे', असे बापू मला सांगत होते.

२००९ ते २०१३ पर्यंत माझ्या बापूंकडे जे काही मी मागितले ते त्यांनी मला दिले आहे. आज माझ्या आयुष्यात अशी कुठलीच गोष्ट नाही जी मला बापूंनी दिलेली नाही. मी माझा प्रत्येक अनुभव भेटणाऱ्या बापूभक्तांना, मित्रांना सांगितला आहे.

तू आणि मी बापू मिळता स्वभावे
साहजिक अद्वैत घडूनी यावे
अशक्य ते शक्य तूची घडवावे
तुझ्या अनंत लिला पाहण्यात रमलो
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो
अनिरुद्धा, तुझा मी किती ऋणी झालो।।